**ठळक बातम्या**

- भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवानिमित्त देशभरात विविध कार्यक्रम
- संविधानाच्या माध्यमातून देशानं सामाजिक न्याय आणि सर्वसमावेशक विकासाचं ध्येय साध्य केलं, असं राष्ट्रपतींचं प्रतिपादन
- राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशनला केंद्रीय मंत्रीमंडळाची मंजुरी
- महाराष्ट्रात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा राजीनामा राज्यपालांना सुपूर्द / नवीन सरकारस्थापनेपर्यंत काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून पाहणार कामकाज

**आणि**

- प्रसिद्ध उद्योजक शशिकांत रुईया यांचं निधन

<><><><><>

भारतीय संविधान दिन आज देशभरात सर्वत्र साजरा होत आहे. ७५ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी भारत सरकारनं राज्यघटनेचा स्वीकार केला होता. त्यानिमित्त आजपासून वर्षभर विविध कार्यक्रमाचं आयोजन केलं जाणार आहे. संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय २०१५ ला सरकारने घेतला. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर दोन वर्षं, अकरा महिने आणि १७ दिवसात संविधान सभेने भारतीय संविधानाची निर्मिती केली. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने संविधानाचा स्वीकार केला आणि २६ जानेवारी १९५० पासून देशभरात याची अंमलबजावणी सुरू झाली. संविधानानुसार भारत एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही

प्रजासत्ताक देश म्हणून घोषित करण्यात आला. संविधानाद्वारे देशातल्या नागरिकांना समता, स्वातंत्र्य आणि न्याय यांची हमी देण्यात आली.

देशात सर्वत्र संविधान दिनानिमित्त पदयात्रा काढण्यात येत आहेत तसंच संविधानाच्या उद्देशिकेचं जाहीर वाचन करण्यात येत आहे. आकाशवाणी मुंबईच्या आवारात आज संविधान दिनानिमित्त उद्देशिकेचं वाचन करण्यात आलं.

**<><><><><>**

संविधानाच्या माध्यमातून देशानं सामाजिक न्याय आणि सर्वसमावेशक विकासाचं ध्येय साध्य केलं, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. संविधान दिनानिमित्त नवी दिल्लीत संविधान सदनाच्या सेंट्रल हॉलमध्ये आयोजित भव्य कार्यक्रमाला त्या संबोधित करत होत्या. आपलं संविधान प्रजासत्ताक व्यवस्थेचा पाया असून नागरिकांचा वैयक्तिक आणि सामाजिक स्वाभिमान सुनिश्चित करण्याचं काम याद्वारे होतं, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात प्रगतीशील आणि सर्वसमावेशक विचारांची पेरणी केली, असं त्या म्हणाल्या. देशातल्या पायाभूत सुविधांची प्रगती आणि महिला सक्षमीकरणासाठी राबवले जाणारे उपक्रम याबद्दल राष्ट्रपतींनी गौरवोद्गार काढले.

**उपराष्ट्रपती** जगदिप धनखड यांनीही या कार्यक्रमाला संबोधित केलं. गेल्या ७५ वर्षात देशानं आर्थिक, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. देशाला आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख मिळाली आहे, त्यामुळे देशात संविधानाची अंमलबजावणी किती प्रभावीपणे केली गेली हे दिसून येतं असं उपराष्ट्रपती म्हणाले. संविधानाच्या प्रस्तावनेद्वारे प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्य, समता आणि न्याय यांची हमी दिली जाते, असंही ते म्हणाले.

संविधान सभेत विविध विचारधारांचे लोक होते, मात्र त्यांनी एकत्र येत संविधानाची निर्मिती केली. हीच परंपरा आपण सभागृहात पुढे न्यायला हवी, असं

लोकसभेचे सभापती **ओम बिर्ला** यांनी सांगितलं. स्वातंत्र्यानंतर संसदेच्या माध्यमातून देशात आर्थिक, सामाजिक परिवर्तन घडलं, लोकशाहीच्या तिन्ही स्तंभांनी देशाच्या समग्र विकासात भर टाकली असंही बिर्ला म्हणाले.

कार्यक्रमाच्या **सुरुवातीला** देशानं संविधान स्वीकारून ७५ वर्षं झाल्यानिमित्त राष्ट्रपतींच्या हस्ते ७५ रुपयांच्या स्मारक नाण्याचं, तसंच टपाल तिकिटाचं अनावरण करण्यात आलं. संविधानाच्या निर्मितीचा इतिहास आणि प्रक्रिया उलगडून दाखवणाऱ्या दोन पुस्तकांचं आनावरणही यावेळी झालं. तसंच संविधानाच्या संस्कृत आणि मैथिली भाषेतल्या प्रतीही यावेळी प्रकाशित करण्यात आल्या. त्याआधी संविधान निर्मितीची माहिती देणारी चित्रफित उपस्थितांना दाखवण्यात आली. या कार्यक्रमाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू, लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी, राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे उपस्थित होते.

**<><><><><>**

भारत एक चैतन्यशील लोकशाही आणि राजकीय नेतृत्व म्हणून उदयास येत असून देशाच्या परिवर्तनाला संविधानानं हाताभार लावला आहे, असं प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी केलं. संविधान दिनानिमित्त सर्वोच्च न्यायालयात बार असोसिएशननं आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. स्वातंत्र्यानंतर संविधानानं देशाच्या प्रगतीत दिलेल्या योगदानाचाही खन्ना यांनी यावेळी पुनरूच्चार केला.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्रिमंडळानं काल नैसर्गिक शेती, रेल्वे आणि तरुणांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असे विविध निर्णय घेतले. मंत्रिमंडळ बैठकीनंतर माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव वार्ताहरांशी बोलताना याबाबत माहिती दिली. नैसर्गिक शेतीला

चालना देण्यासाठी राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन सुरू करण्यात येणार असून त्यासाठी २ हजार ४८१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. या मिशनमध्ये एक कोटी शेतकऱ्यांना सामावून घेतलं जाणार आहे.

रेल्वे मंत्रालयाच्या ७ हजार ९२७ कोटी रुपयांच्या तीन प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. मनमाड-जळगाव या १६० किलोमीटरच्या चौथ्या रेल्वे मार्गिकेचा, तसंच भुसावळ- खांडवा दरम्यानच्या मार्गिकेचा यात समावेश आहे.

याच बैठकीत काल प्राप्तीकर विभागाच्या पॅन प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला मंजुरी देण्यात आली; यासाठी १ हजार ४३५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला.

<><><><>

महाराष्ट्रा<हच्चेमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पदाचा राजीनामा दिला. १४ व्या विधानसभेचा कार्यकाळ आज संपत असल्यानं शिंदे यांनी राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्याकडे मुख्यमंत्री पदाचा राजीनामा सुपूर्द केला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्री दादा भुसे, मंत्री दीपक केसरकर उपस्थित होते. नवीन सरकार स्थापन होईपर्यंत काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून कामकाज पहावं असं राज्यपालांनी एकनाथ शिंदे यांना सांगितलं. आता नवनिर्वाचित आमदारांची १५ वी विधानसभा गठित करण्याची आणि नव्या सरकारच्या स्थापनेची प्रक्रिया सुरू होईल. त्यामुळे आता नवीन सरकार अस्तित्वात येईपर्यंत एकनाथ शिंदे हे काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून कामकाज पाहतील. नवीन सरकारस्थापनेबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.

<><><><>

सव्वीस अकराच्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलिस अधिकारी आणि जवानांचा आज सोळावा स्मृतीदिन. मुंबई पोलिस मुख्यालयात,

राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसंच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी या हल्ल्यातल्या हुतात्म्यांना पुष्पचक्र वाहून आदरांजली व्यक्त केली. हुतात्म्यांचे कुटुंबीय आणि उपस्थित आजी - माजी पोलिस अधिकाऱ्यांची भेट राज्यपालांनी यावेळी घेतली. यावेळी उपस्थित इतर मान्यवर, पोलीस अधिकारी आणि जवानांनी हुतात्म्यांना अभिवादन केलं.

**<><><><><>**

राज्याच्या पोलीस महासंचालक पदी रश्मी शुक्ला यांची पुनर्नियुक्ती झाली आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार शुक्ला यांच्या जागी संजयकुमार वर्मा यांची नेमणूक झाली होती. आणि शुक्ला यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आलं होतं. शुक्ला यांना पदावरुन हटवण्याची मागणी काँग्रेसने केली होती. आता निवडणूक प्रक्रीया संपल्यानंतर शुक्ला यांना पुन्हा नियुक्त करण्याचा आदेश गृहमंत्रालयानं काल काढला आहे.

**<><><><><>**

येत्या दहा वर्षात जगातल्या एकूण दूध उत्पादनापैकी एक तृतियांश उत्पादनाचा वाटा उचलण्याचं भारताचं उद्दीष्ट आहे, असं गुजराथ सहकारी दूध विपणन संघ म्हणजेच अमूल संघाचे व्यवस्थापकीय संचालक जयेन मेहता यांनी म्हटलं आहे. राष्ट्रीय दुग्ध दिनानिमित्त आकाशवाणी प्रतिनिधीशी बोलताना मेहता यांनी अमेरिकेनंतर आता युरोपात अमूल आपली ओळख निर्माण करण्याच्या तयारीत असल्याचं नमूद केलं. येत्या काळात दोन लाखांहून अधिक गावांमध्ये दूध सरकारी संघ स्थापन करायच्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीची मेहता यांनी प्रशंसा केली.

**<><><><><>**

प्रसिद्ध उद्योजक आणि एस्सार उद्योगसमूहाचे सह संस्थापक शशिकांत रुइया यांचं काल मध्यरात्रीच्या सुमारास मुंबईत निधन झालं. ते ८१ वर्षांचे होते. दीर्घ आजारावर अमेरिकेत उपचार घेऊन ते महिनाभरापूर्वीच मुंबईत परतले होते. १९६९मधे त्यांनी आणि रवि रुइयांनी एस्सार उद्योगसमूहाची स्थापना केली. तेल, वायू उत्खनन तसंच उर्जानिर्मिती, बंदर आणि इतर उद्योगात एस्सार समूहाने मानाचं स्थान मिळवलं. रुईया यांनी अनेक समाजोपयोगी कार्यातही भरीव योगदान दिलं. शशिकांत रुईया यांच्या निधनाबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. रुईया यांची दूरदृष्टी, नेतृत्व आणि कल्पकता यामुळे देशातल्या उद्योगक्षेत्राचं रंगरूप बदललं अशा शब्दात प्रधानमंत्र्यांनी रुईया यांना आदरांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

भारतीय तटरक्षक दलाने काल अंदमानजवळच्या समुद्रात एका मच्छिमार बोटीतून अवैध अंमली पदार्थ पकडले. भारतीय तटरक्षक दलाच्या डॉर्नियर विमानांनी आपल्या नियमित गस्तीदरम्यान या बोटीच्या संशयास्पद हालचाली टिपल्या. ही बोट समुद्राच्या भारतीय हद्दीत बॅरन बेटाजवळ असताना संयुक्त कृती दलाच्या कर्मचाऱ्यांनी बोटीवर जाऊन झडती घेतली. बोटीवरच्या कर्मचाऱ्यांसह साधारण ५ हजार ५०० किलो अंमली पदार्थ आणि एक सॅटेलाईट फोन पोलिसांनी ताब्यात घेतले.

**//<><><><><>//**